दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक १५ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.५ नोव्हेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व अ‍ॅडवेंचर पार्क
कोळोना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# मी मुख्यमंत्रीपदासाठी तयार:रामदास आठवले यांनी व्यक्त केली इच्छा

## मनोज जरांगेंच्या भूमिकेचेही केले स्वागत;कार्यकर्त्यांनी बंडखोरीच्या मागे उभे राहू नये

नाशिक (वृत्तसंस्था)–आमच्यामध्ये वाद झाले तर तर मुख्यमंत्री पदासाठी मी तयार आहे, असे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले आहेत. नाशिक येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी मुख्यमंत्रीपदासाठी इच्छुक असल्याचे जाहीर केले आहे. केंद्रीय नेते आणि आम्ही निर्णय घेऊ, असे देखील त्यांनी यावेळी सांगितले आहे.पुढे बोलताना रामदास आठवले म्हणाले, जरांगे पाटील यांच्या भूमिकेचा आम्हाला फायदा होणार आहे. राज ठाकरेंनी आपले उमेदवार उभे केले त्याचा फायदाही आम्हाला होणार आहे. राजू शेट्टी, संभाजीराजे यांच्या आघाडीचा देखील आम्हाला फायदा होणार असल्याचे आठवले म्हणाले. तसेच आमच्या पक्षाला ४ ते ५ जागा मिळायला पाहिजे होत्या, मात्र एकच जागा देण्यात आली आहे. तरीही कार्यकर्त्यांनी बंडखोरीच्या मागे उभे राहू नये. केंद्रीय मंत्री, महामंडळ अशी पदे आपल्याकडे आहेत, त्यामुळे कार्यकर्त्यांनी महायुतीच्या मागे उभे राहावे, असे आवाहन देखील त्यांनी कार्यकर्त्यांना केले आहे. याच सोबत नवीन मित्र झाले म्हणून आम्हाला भाजपने मागे टाकू नये, असा इशारा देखील रामदास आठवले यांनी दिला आहे.



### गरीब मराठ्यांना आरक्षण दिले पाहिजे

पुढे बोलताना रामदास आठवले म्हणाले, आरपीआयच्या मतांचा महायुतीला फायदा झाला आहे. हरियाणामध्ये लोकसभेला कमी जागा आल्या, मात्र विधानसभेला जास्त जागा आल्या. आमचा आत्मविश्वास वाढला आहे. ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर लढणार आहोत. तसेच मराठा समाजाच्या मागे सरकार उभे आहे. गरीब मराठ्यांना आरक्षण दिले पाहिजे, असे देखील आठवले यावेळी म्हणाले.

### कोणाला ओबीसी म्हणायचे हा सर्वस्वी अधिकार केंद्राचा

मनोज जरांगे यांच्याविषयी बोलताना रामदास आठवले म्हणाले, जरांगे फॅक्टर चालणार नाही. मराठा समाजाच्या मागे सरकार उभे आहे. गरीब मराठ्यांना आरक्षण दिले पाहिजे, पण केंद्राने आर्थिक १० टक्के आरक्षण दिले आहे. मनोज जरांगे यांची मागणी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची आहे. सर्व मराठा समाजाला ओबीसीमध्ये आरक्षण देणे शक्य नाही. तसेच कोणाला ओबीसी म्हणायचे हा सर्वस्वी अधिकार केंद्राचा आहे, असेही रामदास आठवले यांनी स्पष्ट सांगितले आहे.

### कोणात वाद झाले तर मुख्यमंत्री पदासाठी मी तयार

पत्रकार परिषदेत बोलताना रामदास आठवले म्हणाले, मनोज जरांगेंची भूमिका योग्य, त्यांना आता राजकारण कळू लागले आहे. काही वेळा दोन पावले मागे यावे लागते. मनसे महायुतीमध्ये नाही, त्यांनी काही उमेदवार उभे केले आहेत. भाजप आणि मनसेमध्ये अंडरस्टँडिंग आहे. मनसेचा युतीला फायदा होणार आहे. मुख्यमंत्री महायुतीचा होणार या राज ठाकरेंच्या मताशी सहमत आहे. आमच्यात वाद होणार नाही. केंद्रीय नेते आणि आम्ही निर्णय घेऊ. कोणात वाद झाले तर मुख्यमंत्री पदासाठी मी तयार आहे, असे त्यांनी थेट सांगितले आहे.

# राहुरीत बंडखोरीची लाट

# महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांची वाढली डोकेदुखी

## दैनिक सह्याद्रीचा राखणदाराने दिलेला अंदाज खरा ठरला

**राहुरी । शहाजी दिघे**

दैनिक सह्याद्रीचा राखणदाराने दिलेला अंदाज खरा ठरला असून, जिल्ह्यातील आठ मतदारसंघांमध्ये बंडखोरीची लाट पसरली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असताना, बंडाळीमुळे राजकीय गणिते बदलली आहेत.

आज उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी बंडखोरी निश्चित झाल्याने, संबंधित मतदारसंघांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. राज्यात भाजप, शिवसेनेचा शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट असलेली महायुती आणि काँग्रेस, शिवसेनेचा ठाकरे गट व राष्ट्रवादी काँग्रेसचा शरद पवार गट असलेली महाविकास आघाडी यामध्ये संघर्ष सुरू आहे.अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तथापि, शिवसेनेच्या ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख शशिकांत गाडे यांनी त्यांच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांना मोठा प्रतिस्पर्धी समोर आला आहे. अकोले विधानसभा मतदारसंघात



दैनिक सह्याद्रीचा राखणदार

अहिल्यानगरमध्ये बंडखोरीची लक्षणे

विधानसभा निवडणुकांमध्ये उमेदवारांची वाढती संख्या

राहुरी । शहाजी दिघे


आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगरमध्ये बंडखोरीची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागली आहेत. गणेश उत्सव, देवी नवरात्र उत्सव, वयोश्री योजना, शेतकऱ्यांची वीज बिल माफी, बांधकाम मजूर योजना यांसारख्या विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने इच्छुक उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. यामुळे निवडणुकांच्या आधीच राजकीय वातावरण पूर्णपणे बदलले आहे.

राजकीय तज्ज्ञांच्या मते, दसऱ्यानंतर कधीही विधानसभेच्या निवडणुकांच्या तारखांची घोषणा होण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगानेही याबाबत संकेत दिले आहेत. येत्या दोन-तीन दिवसांत निवडणुकांच्या तारखांची घोषणा होईल आणि आचारसंहिता लागेल, असा अंदाज वर्तवला जात आहे.

गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला महाराष्ट्रात चांगले यश मिळाले होते. या शिवसेना यांच्यातील फूट स्पष्टपणे दिसून आली होती, ज्यामुळे या निवडणुकीत महाविकास आघाडीला लाभ झाला. आता, आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी आणि महायुतीमधील घटक पक्षांमध्ये बंडखोरी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे उमेदवारांची संख्या वाढणार आहे, अशी माहिती मिळाली आहे.

विजयी होईल हे ठरवताना जनता जनार्दनचा कौल महत्त्वाचा ठरणार आहे. अद्यापही, महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, शरद पवार गट, शिवसेना ठाकरे गट यांच्यात बंडखोरीची शक्यता आहे, तसेच महायुतीमध्ये भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्यातील तणाव वाढत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात, दोन बारा विधानसभा मतदारसंघ येतात. २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने सहा, भाजपने तीन, आणि काँग्रेसने दोन जागा जिंकल्या होत्या. अपक्षांनी एक जागा जिंकली होती. मात्र, सध्याच्या राजकीय परिस्थितीमध्ये उमेदवारांची संख्या वाढण्याची अपेक्षा आहे, कारण इच्छुक उमेदवारांनी या सर्व पक्षांमधून प्रवेश घेतला आहे. अशा परिस्थितीत, निवडणुकीसाठी अनेकजण एका जागेसाठी इच्छुक आहेत, त्यामुळे उमेदवारांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. गेल्या निवडणुकांच्या तुलनेत, यंदाच्या निवडणुकांमध्ये बंडखोरीचे प्रमाण वाढेल आणि यामुळे विविध पक्षांमध्ये आपसात चुरस वाढेल, असे दिसते. आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये बंडखोरीचा प्रभाव वाढणार आहे, याबाबत सर्वांनाच स्पष्टता आहे. हे राजकीय गटांमधील चुरशीचे लक्षण असून, अधिकाधिक उमेदवारांची संख्या वाढेल, हे निश्चित आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत कोणता पक्ष आपला विजय मिळवेल, हे पाहणे




महायुतीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांना उमेदवारी दिली आहे, मात्र भाजपचे माजी आमदार वैभव पिचड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने महायुतीत बंडखोरीचा इशारा देण्यात आला आहे.

नेवासे मतदारसंघात महायुतीने शिंदे गटाच्या विठ्ठलराव लंघे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तथापि, भाजपचे माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी बंड करत अपक्ष उमेदवारी दिली आहे. त्यामुळे ठाकरे गटाचे उमेदवार शंकरराव गडाख यांना प्रतिस्पर्ध्यांचा सामना करावा लागणार आहे.शिर्डी मतदारसंघात मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांना महायुतीने उमेदवारी दिली आहे, परंतु त्यांच्या विरोधात काँग्रेसच्या प्रतिभा घोगरे आणि विखेंचे पारंपरिक विरोधक राजेंद्र पिपाडा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. पारनेर मतदारसंघात महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने काशिनाथ दाते यांना उमेदवारी जाहीर केली आहे. याचवेळी, माजी आमदार विजय भास्करराव औटी आणि अजित पवार गटाचे विजय सदाशिव औटी यांनीही उमेदवारी अर्ज कायम ठेवले आहेत.श्रीगोंदा मतदारसंघात महाविकास आघाडीने शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या अनुराधा नागवडे यांना उमेदवारी जाहीर केली, परंतु शरद पवार गटाचे माजी आमदार राहुल जगताप यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. शेवगाव–पाथर्डी मतदारसंघात महायुतीने भाजपच्या आमदार मोनिका राजळे यांना उमेदवारी दिली आहे. परंतु, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे माजी आमदार चंद्रशेखर घुले यांनी बंड करून उमेदवारी जाहीर केली आहे.श्रीरामपूर मतदारसंघात काँग्रेसने आमदार लहू कानडे यांना नाकारून हेमंत ओगले यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे नाराज झालेल्या कानडे यांनी अजित पवार गटात प्रवेश करून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.राजकीय समीकरणे या बंडखोरीमुळे कोणाच्या फायद्यात ठरतील, हे पुढील काळात स्पष्ट होईल.

# राज ठाकरे यांनी प्रचाराचा नारळ फोडला;ठाकरे–पवारांवर कडाडली तोफ



**डोंबिवली । मनोज उतेकर**

विधानसभा निवडणुकीचा प्रचार सुरू करताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली. राज ठाकरे यांनी दिवाळीनंतर कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात मनसे उमेदवाराच्या प्रचारासाठी सभा घेतली.

राज ठाकरे यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मी फक्त दर्शन घेण्यासाठी आलो आहे. प्रचाराला ताप आणायचा आहे, असे सांगून केली. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील राजकारणावर टीका करत म्हणाले की, २०१९ मध्ये जनतेने दिलेल्या मतांचा अनादर झाला असून सत्ता संघर्षात पक्षांनी भूमिका बदलली आहे. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांना लक्ष केले आणि विचारले, मोदी–शहा यांनी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील असे सांगितले होते, त्यावेळी तुम्ही का आक्षेप घेतला नाही?

**राजू पाटील यांचा गौरव**

राज ठाकरे यांनी मनसे आमदार राजू पाटील यांचे कौतुक करत म्हटले, राजू विधानसभेत एकटा उभा राहिला, तो टिकला, विकला नाही. त्यांनी कोविड काळात राजू पाटील यांच्या योगदानाचे कौतुकही केले.

**ेडाफोडीचे जनक – शरद पवार**

राज ठाकरे यांनी राज्यातील राजकीय अस्थिरतेसाठी शरद पवार यांना जबाबदार धरत त्यांच्यावर फोडाफोडीचा आरोप केला. १९७८ मध्ये काँग्रेस, १९९२ मध्ये शिवसेना आणि २००५ मध्ये नारायण राणेंना फोडून त्यांनी फोडाफोडीचा पाया रचला, असे ते म्हणाले. ठाकरे यांनी धनुष्यबाण हे बाळासाहेब ठाकरे यांचे असून, शरद पवारांचे अपत्य घड्याळ हेच असल्याचे नमूद केले.

**मुख्यमंत्र्यांवर टीका**

राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या सभेत झालेल्या एका घटनेचा दाखला देत ही लाडकी बहीण योजना आहे का? असा उपरोधिक प्रश्न केला. यावेळी त्यांनी शिंदे यांच्यावर सामाजिक जाणिवांची मागणी करत टीका केली.

**हिंदुत्वाचा मुद्दा उचलला**

राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंवर हिंदुत्वावरून घणाघाती टीका करत आरोप केला की, सत्तेसाठी त्यांनी हिंदुत्वाचा त्याग केला आहे. आघाडीमध्ये जाताच उद्धव ठाकरेंनी बाळासाहेब ठाकरे यांच्या नावापुढील 'हिंदू हृदयसम्राट' शब्द हटवले, असा आरोप राज यांनी केला.

**महाराष्ट्राच्या विकासाचा संकल्प**

सभेच्या शेवटी राज ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी आपल्याला संधी देण्याचे आवाहन करत महाराष्ट्राचा सन्मान राखण्यासाठी माझी तळमळ आहे, असे सांगून राज्याच्या विकासाचे संकल्प उचलले.

# गोवंश तस्करीच्या पुरावे नष्ट करण्यासाठी ट्रक पेटवला

**समुद्रपूर । प्रतिनिधी**

गोवंशाची तस्करी होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर समुद्रपूर, सेवाग्राम आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एक ट्रक पकडण्यासाठी पाठलाग केला. परंतु, समृद्धी महामार्गावर नाकाबंदी केल्यानंतर ट्रक चालकाने पोलिसांच्या दोन्ही वाहनांना धडक देत ट्रक विरूळ आकाजी परिसरात थांबवला. चालकाने पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने ट्रक जाळून दिला आणि त्याचवेळी ट्रकमधील तिघेही फरार झाले. या थरारक घटनेत पोलिसांनी १५ जनावरांना सुरक्षितपणे बाहेर काढले, परंतु यातील १२ ते १५ जनावरांचा होरपळून मृत्यू झाला.



उमरेड–सिर्सी मार्गाने गोवंश भरलेला ट्रक जात असल्याची माहिती बेला पोलिसांनी समुद्रपूर पोलिसांना दिली होती. त्यानुसार, ठाणेदार संतोष शेगावकर यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेने तात्काळ कारवाई सुरू केली. या घटनेमुळे पोलिस यंत्रणेत खळबळ माजली आहे.फरार झालेल्या चालकांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# जय वीरभद्र दूध संकलन केंद्रा तर्फे दिवाळीनिमित्त मिठाई भेट

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील गोळवाडी येथील जय वीरभद्र दूध संकलन केंद्रातर्फे ग्राहकांना दिवाळीनिमित्त मिठाई देऊन सन्मानित करण्यात आले. दूध डेअरीचे चेअरमन शंकर गावंडे यांनी चांगल्या प्रतीचे दूध संकलन केल्याबद्दल ग्राहकांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमात शंकर गावंडे यांनी ग्राहकांना आवाहन केले की, जय वीरभद्र दूध संकलन केंद्राला चांगल्या दर्जाचे दूध द्यावे. तसेच त्यांनी आश्वासन दिले की, यापुढेही आम्ही तुम्हाला उच्च दर्जाचे दूध पुरवू. ग्राहकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल गावंडे यांनी आभार



मानले.या प्रसंगी गावातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. यामध्ये भीमराज पगार, गणेश सोनवणे, आबासाहेब वाघ, पवन राजपूत, भाऊसाहेब सोनवणे, हुकुम पगार, विलास गावंडे, भगवान मांजरे, बालू पगार आणि गावंडे परिवाराचे सदस्य सहभागी झाले होते.

## मलवडी येथे नारायण पाटील गटाला धक्का

# पै.बंडुनाना कोंडलकर व उपसरपंच साहेबराव दुरगुळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते संजय शिंदे गटात

**सोलापूर । प्रतिनिधी**

मलवडी येथे माजी आमदार नारायण पाटील यांच्या गटाला मोठा धक्का बसला असून, पैलवान बंडुनाना कोंडलकर व उपसरपंच साहेबराव दुरगुळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते आमदार संजय शिंदे यांच्या गटात सामील झाले आहेत. आमदार शिंदे यांनी २०१७ पासून करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी अपार मेहनत घेतली असल्याचे सांगितले व प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांना भावासारखे पाठबळ देण्याचे आश्वासन दिले.

मलवडी येथे आयोजित सभेत विजय पालवे, गुरुनाथ पालवे, राघू कोंडलकर, रमेश कोंडलकर, आबा कोंडलकर, रेवणनाथ कोंडलकर, सर्जेराव कोंडलकर, रवींद्र पालवे, सर्जेराव बागल, पप्पू कोळी, कल्याण सातव तसेच पाथुर्डी येथील सदाशिव तोडेकर, हनुमान तोडकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला.

यावेळी माजी सभापती गोकुळ पाटील, ज्ञानेश्वर शेलार, माजी जिल्हा परिषद सदस्य उध्दव माळी, चंद्रहास निमगिरे, माजी पंचायत समिती सदस्य विलास पाटील, सरपंच तानाजी झोळ, पैलवान उमेश इंगळे, राजेंद्रकुमार बारकुंड, म्हैसगावचे लक्ष्मण पाटील, प्रविण पाटील, धनंजय मोरे, मारुती पारखे, सरपंच किरण फुंदे, सरपंच रवींद्र वळेकर, घोटीचे सरपंच विलास राऊत, गुलाबराव देवकते, भाऊसाहेब खरात, अभिजित तळेकर, पैलवान चेतन पाटील, सनी टकले, महावीर कोंडलकर, शहाजी कोंडलकर, सिध्दूभाऊ मोटे, मयुर रोकडे, अशोक तकिक यांसारखे विविध क्षेत्रातील मान्यवरही उपस्थित होते.प्रारंभी मलवडी गावातून आमदार संजय शिंदे यांची घोड्यावरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. फटाक्यांच्या आतिषबाजीमध्ये सभास्थळी त्यांच्या स्वागतासाठी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.




### २०२४ च्या निवडणुकीत विजय निश्चित – पै.बंडुनाना कोंडलकर

**२०१९ च्या निवडणुकीत नारायण पाटील यांना १,००० मतांची आघाडी दिल्याचे पै. बंडुनाना कोंडलकर यांनी सांगितले. आता मलवडी, पाथुर्डी, घोटी आणि इतर गावातील कार्यकर्ते संजय शिंदे यांच्या गटात सामील होत आहेत, त्यामुळे २३ नोव्हेंबर रोजी शिंदे यांच्या विजयासाठी भविष्यकाराची गरज भासणार नाही, असे कोंडलकर यांनी स्पष्ट केले.**

## कोपरगावातील जनता संदीप वर्पे यांना आमदार केल्या शिवाय राहणार नाही–खा.निलेश लंके

**कोपरगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीत कोपरगाव विधानसभा मतदारसंघ कायम चर्चेत आहे, कारण येथील निवडणूक साधारणतः काळे आणि कोल्हे कुटुंबांमध्येच होणार असते. परंतु यावर्षी महायुतीकडून विद्यमान आमदार आशुतोष काळे यांच्या विरोधात महाविकास आघाडीने सर्वसामान्य शिक्षक कुटुंबातील संदीप वर्पे यांना उमेदवारी दिली आहे.



संदीप वर्पे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या कार्यक्रमात खासदार निलेश लंके यांनी उपस्थित राहून जोरदार भाषण केले. त्यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे पारनेर विधानसभा मतदारसंघात २०१९ मध्ये जनतेने मला आमदार केले, तसाच विश्वास कोपरगावच्या जनतेने संदीप वर्पे यांच्यावर ठेवला, तर ते आमदार होणार.

भाजपा आणि महाविकास आघाडीच्या युतीमुळे कोपरगाव विधानसभा मतदारसंघाची निवडणूक एकतर्फी होईल, असे अनुमान व्यक्त केले जात असताना, शरद पवारांनी संदीप वर्पे यांना उमेदवारी देऊन या निवडणुकीत एक महत्त्वाचा ट्विस्ट आणला आहे.

खासदार निलेश लंके यांनी आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली, की पन्नास वर्षांपासून अहिल्यानगर जिल्ह्यावर विखे पाटील घराण्याचे प्राबल्य होते, परंतु शरद पवारांनी माझ्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील शिक्षकावर विश्वास ठेवून मला खासदार बनवले. याच यशाची पुनावृत्ती कोपरगाव विधानसभा निवडणुकीत होणार आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, दिंडोरीच्या खासदाराने संदीप वर्पे यांच्या कामाबद्दल उल्लेख केला. संदीप वर्पे यांनी लोकसभेच्या निवडणुकीत माझ्या मतदार संघामध्ये महत्त्वाचे कार्य केले आहे. कोपरगाव मतदार संघातील जनतेने पवार साहेबांचे निष्ठावान कार्यकर्ते संदीप वर्पे यांना आमदार करावे, असे आवाहन त्यांनी केले.कोपरगावच्या निवडणुकीत सर्वसामान्य जनतेच्या सहकार्याने संदीप वर्पे यांना विजय मिळवण्याचे ठरवले असल्याने, या निवडणुकीत महाविकास आघाडीने एक मजबूत ठसा सोडला आहे.

## दौंडसाठी निवडणूक निर्णय अधिकारी बदल




**दौंड । प्रतिनिधी**

दौंड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारीपदावर प्रांताधिकारी मिनाज मुल्ला यांच्या जागी उपजिल्हाधिकारी गणेश मरकड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुकीतील अपक्ष उमेदवारांच्या अर्जांवर पक्षपाती वागणूक दिल्याचा आरोप करत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती.

४ नोव्हेंबर रोजी गणेश मरकड यांनी दौंड मतदारसंघासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पदभार स्वीकारला. मिनाज मुल्ला यांची आरोग्य कारणास्तव पुणे येथे उपचार सुरू असल्यामुळे त्यांनी वैद्यकीय रजा घेतल्याचे सांगण्यात आले.

अर्ज भरण्याच्या प्रक्रियेदरम्यान अपक्ष उमेदवारांच्या अर्जांमध्ये विविध त्रुटी दाखवत त्यांना वारंवार दुरुस्तीच्या कारणावरून अडचणीत आणण्यात येत असल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. अपक्ष उमेदवार जितेंद्र कोंडीराम पितळे यांनी या प्रकारात सरकारी महसूल बुडवण्याचा मुद्दा उपस्थित करत संबंधितांची सखोल चौकशी करून कारवाईची मागणी केली आहे.

### अर्ज विक्रीत मोठी तफावत

**दौंड मतदारसंघात एकूण ८० अर्ज विकले गेले असताना केवळ २२ उमेदवारांचे २७ अर्जच दाखल झाले. या तफावतीमुळे निवडणूक प्रक्रियेत पक्षपातीपणा होत असल्याचा संशय निर्माण झाला आहे, आणि सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे.**

## वर्धा विधानसभा निवडणुकीत ५ उमेदवारांची माघार,१६ उमेदवार रिंगणात




**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या ५ नेत्यांनी आज उमेदवारी मागे घेतल्यामुळे रिंगणात आता १६ उमेदवार राहिले आहेत. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी समीर देशमुख, सुधीर पांगूळ, सतीश आडे आणि रेणुका कोटंबकार यांनी आपल्या उमेदवारीच्या अर्जाची माघार घेतली.

वर्धा मतदारसंघात २१ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते, ज्यात प्रमुख राष्ट्रीय पक्षांचे उमेदवार देखील समाविष्ट होते. आता भाजप महायुतीकडून आ. डॉ. पंकज भोयर, काँग्रेस महाविकास आघाडीतून शेखर शेंडे आणि अपक्ष डॉ. सचिन पावडे यांच्यात तिहेरी लढतीचा रंग स्पष्ट झाला आहे.

## आचार संहितेसंबंधी तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याचे निर्देश



**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदार संघातून आलेल्या आचार संहितेसंबंधी तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याचे निर्देश निवडणूक निरीक्षक (सामान्य) जयप्रकाश सिंग आणि विनय बुबलानी यांनी दिले. आज विश्रामगृहात आयोजित बैठकीत आदर्श आचारसंहिता (एमसीसी), सायबर सुरक्षा व तंत्रज्ञान, माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती (एमसीएमसी) यांचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीत एमसीसीचे नोडल अधिकारी जितीन रहमान, जिल्हा माहिती अधिकारी रवी गिते, क्षेत्रीय प्रचार अधिकारी हंसराज राऊत, सायबर सुरक्षा तज्ञ नितीन चौधरी, सहायक पोलिस निरीक्षक सुमंतराज भुजबळ आणि जनसंपर्क अधिकारी बुध्ददास मिरगे उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि शुद्धता राखण्यासाठी आचार संहितेच्या नियमांचे पालन अनिवार्य आहे, यावर सर्वांनी एकमताने सहमती दर्शवली. तक्रारींचे तात्काळ निराकरण सुनिश्चित करण्यासाठी योग्य ती पावले उचलली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

## जय वीरभद्र दूध संकलन केंद्रा तर्फे दिवाळीनिमित्त मिठाई भेट



**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील गोळवाडी येथील जय वीरभद्र दूध संकलन केंद्रातर्फे ग्राहकांना दिवाळीनिमित्त मिठाई देऊन सन्मानित करण्यात आले. दूध डेअरीचे चेअरमन शंकर गावंडे यांनी चांगल्या प्रतीचे दूध संकलन केल्याबद्दल ग्राहकांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमात शंकर गावंडे यांनी ग्राहकांना आवाहन केले की, जय वीरभद्र दूध संकलन केंद्राला चांगल्या दर्जाचे दूध द्यावे. तसेच त्यांनी आश्वासन दिले की, यापुढेही आम्ही तुम्हाला उच्च दर्जाचे दूध पुरवू. ग्राहकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल गावंडे यांनी आभार मानले.


या प्रसंगी गावातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. यामध्ये भीमराज पगार, गणेश सोनवणे, आबासाहेब वाघ, पवन राजपूत, भाऊसाहेब सोनवणे, हुकुम पगार, विलास गावंडे, भगवान मांजरे, बालू पगार आणि गावंडे परिवाराचे सदस्य सहभागी झाले होते.

# गर्दीतून मार्ग काढत महिलेने केले ना.मुनगंटीवार यांचे औक्षण ;बहिणीच्या प्रेमाने भारावले ना.सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीचे प्रचंड धावपळ. प्रचाराचा धुरळा. चाहत्यांचा गराडा. असं सगळं वातावरण असताना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांना गहिवरून आलं. सण, उत्सव काहीही असो मुनगंटीवार सातत्याने आपल्या कामात व्यस्त असतात. त्यांचा जनसंपर्क कायम असतो. आलेल्या प्रत्येकाची त्यांच्याकडून आत्मियतेने विचारपूस केली जाते. प्रत्येकाबद्दल असलेल्या तळमळीच्या त्यांच्या याच स्वभावाची परतफेड आता लोक त्यांना प्रचारादरम्यान देत आहेत. असाच एक भावनिक प्रसंग नुकताच घडला.

दिवाळीच्या उत्सवात येणारा भाऊबीजेचा क्षण हा भाऊ बहिणींमधील नात्याच्या दृष्टीने फारच भावनिक असतो. यंदा दिवाळी आणि विधानसभा निवडणूक एकत्र आल्याने सध्या सर्वत्र प्रचार सुरू आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्या मात्र प्रचार नसून जनसंपर्क सुरू आहे. लोकांच्या सुखदुःखात धावून जाणाऱ्या सुधीर मुनगंटीवार यांच्याप्रति लोक आता आपापल्या पद्धतीने भावना आणि आदर व्यक्त करीत आहेत.





ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या भोवती चाहत्यांचा गराडा होता. या गरड्यातून वाट काढत एक महिला पुढे सरसावली. या महिलेच्या हातात एक थाळी होती. थाळीमध्ये असलेल्या दिव्यातील ज्योती ना.मुनगंटीवार यांची प्रतीक्षा करीत होती. कार्यकर्त्यांच्या गराड्यातून मुनगंटीवार यांचे लक्ष या महिलेकडे गेले. क्षणाचाही विलंब न लावता ते देखील पुढे सरसावले आणि तो भावनिक क्षण जुळून आला.

इटोली गावातील मायाबाई चरणदास पिपरे यांनी सुधीर मुनगंटीवार यांना औक्षण केले. भाऊबीजेच्या शुभ पर्वावर या एका गरीब बहिणी कडून तुम्हाला शुभेच्छा, असे शब्द मायाताईंच्या तोंडून बाहेर पडले. हे बोलत असताना त्यांचा कंठ दाटून आला होता. त्यांच्या भावना आणि बहिणीचे प्रेम त्यांच्या डोळ्याच्या पाणावलेल्या कडा स्पष्टपणे सांगत होत्या. गावातील बहिणीचा हे प्रेम पाहून सुधीर मुनगंटीवार हे देखील गहिवरले. अत्यंत नम्रतेने दोन्ही हात जोडत त्यांनी आपल्या या बहिणीचं औक्षण स्वीकारलं. ताई मी आता काय बोलू? अशा भावना सुधीर मुनगंटीवार यांच्या मनात दाटून आल्या.

असेच अनेक भावनिक प्रसंग सुधीर मुनगंटीवार यांच्या जनसंपर्क दौऱ्यादरम्यान दिसून येत आहे. आपली राजकीय कारकीर्द सुरू झाल्यापासून मुनगंटीवार हे जनतेची सेवा ही आपली जबाबदारी आणि कर्तव्य मानतात. आपल्यावर जनसेवेची मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे जातपात, धर्म, पंथ याच्या पलीकडे जात आपल्याला काम करायचं आहे, असच ते नेहमी सांगत असतात. सुधीर मुनगंटीवार यांच्या बाबतीत 'दिला शब्द केला पूर्ण' असं ठामपणे सांगण्यात येतं. त्यामुळे लोकांच्या सुखदुःखात धावून जाणाऱ्या मुनगंटीवार यांना अशा अनेक बहिणी औक्षण करीत आहेत. ज्येष्ठ नागरिकांचे थरथरणारे अनेक हात त्यांना आशीर्वाद देण्यासाठी सरसावत आहेत. आजपर्यंत अनेकांच्या मदतीसाठी मुनगंटीवार धावून गेले. आपण किती लोकांना मदत केली याचा हिशोब त्यांनी कधी ठेवला नाही. सत्कर्म करत रहा या श्रीकृष्णाच्या उपदेशाप्रमाणे ते आपले कर्तव्य पार पाडत आहेत. अशातच अनेक गावांमध्ये गर्दीतून अचानक पणे कोणीतरी समोर येतो आणि म्हणतो भाऊ आज जे आमचं चांगलं होत आहे ते तुमच्यामुळेच आहे. तुम्ही त्यावेळेला मदत केली नसती तर.. असे अनेक प्रसंग सध्या मुनगंटीवार यांच्यासोबत असलेल्या सर्वांनाच अनुभवायला येत आहे. यावर मुनगंटीवार अत्यंत नम्रपणे एकच उत्तर देतात मी फक्त माझं कर्तव्य करीत आहे. माझी जबाबदारी पार पाडत आहे.

# राज्यातील उद्योग स्थलांतरामुळे युवकांना बेरोजगारीची झळ-कराळे

**मूल । प्रतिनिधी**

राज्यातील उद्योग गुजरातला हलवून महायुतीच्या सरकारने राज्यातील युवकांना बेरोजगार केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश प्रवक्ते नितेश कराळे यांनी केला आहे. बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील तीन आदिवासी निवासी आश्रमशाळा बंद करून आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले. कराळे बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार संतोषसिंह रावत यांच्या प्रचार सभेत पोंभूर्णा येथे बोलत होते.




कराळे यांनी ३३ कोटी वृक्ष लागवड योजनेतील भ्रष्टाचारावरही टीका करताना, सध्याचे सरकार केवळ आर्थिक लाभ मिळवून देणाऱ्या योजना राबवत असल्याचा आरोप केला. महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यास जनतेच्या घराघरात प्रीपेड विद्युत मीटर लावून आर्थिक शोषण करेल, असा इशारा त्यांनी दिला. तसेच, उमा आणि अंधारी नदीवर बंधारे न बांधल्याने शेतकऱ्यांना सिंचनाची सोय मिळाली नसल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ राबविल्या जाणाऱ्या शेतकरी कल्याण योजनेबाबत, खत व कीटकनाशकांवर लादलेला जीएसटी अन्यायकारक असल्याचे कराळे यांनी स्पष्ट केले. काही दिवसांपूर्वी पोंभूर्णा येथे राज्यपालांनी आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी पेसा कायद्याची अपेक्षा पूर्ण न केल्याबद्दल आदिवासी समाजात नाराजी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र वैद्य यांनी अभी नही तो कभी नही म्हणत मतदारांनी संतोषसिंह रावत यांना समर्थन देण्याचे आवाहन केले. त्यांनी रावत यांच्या सामाजिक कार्याचा उल्लेख करत त्यांना योग्य उमेदवार ठरवले.

सभेत उमेदवार संतोषसिंह रावत यांनी मतदारांनी आपल्या कार्यावर विश्वास ठेऊन मतदान रूपी आशीर्वाद द्यावा, असे आवाहन केले. जिल्हा काँग्रेसचे सचिव ओमेश्वर पदमगिरीवार यांनी प्रास्ताविक केले, तर प्रशांत झाडे यांनी संचलन आणि धम्मा निमगडे यांनी आभार मानले.

सभेला पवन भगत, विजय चिमड्यालवार, चित्रा डांगे, वैशाली बुरांडे, अशोक गेडाम, गुरूदास गुरनुले यांसह विविध क्षेत्रातील हजारो नागरिक उपस्थित होते. यावेळी जनस्वराज संघटना चंद्रपूरने महाविकास आघाडीचे उमेदवार संतोषसिंह रावत यांना पाठिंबा जाहीर केला.

# अपक्ष उमेदवार डॉ.अभिलाषा गावतुरेंना विविध सामाजिक संघटनांचा पाठिंबा

**मूल । प्रतिनिधी**

बल्लारपूर विधानसभा क्षेत्र सध्या चर्चेत आले असून, येथे अपक्ष उमेदवार डॉ. अभिलाषा गावतुरे यांना विविध सामाजिक संघटनांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. काँग्रेसची उमेदवारी मिळेल, अशी अपेक्षा असतानाही अखेरच्या क्षणी त्यांची उमेदवारी नाकारून संतोष रावत यांना उमेदवारी देण्यात आली. यामुळे स्थानिक जनतेत रोष निर्माण झाला असून, डॉ. गावतुरे यांच्या समर्थनार्थ विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन एकजुटीने पाठिंबा दर्शवला आहे.





या पार्श्वभूमीवर बल्लारपूर येथील एका मोठ्या हॉटेलमध्ये आयोजित चिंतन बैठकीत ओबीसी, दलित, आदिवासी समुदायांच्या ४०० हून अधिक प्रतिनिधींनी हजेरी लावली. बैठकीत उपस्थितांनी डॉ. अभिलाषा गावतुरे यांना अपक्ष उमेदवार म्हणून पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे, चंद्रपूर विधानसभेतील अपक्ष उमेदवार राजू झोडे, ज्यांनी मागील निवडणुकीत ४०,००० मते मिळवली होती, हे देखील उपस्थित होते. त्यांच्या पाठिंब्यामुळे डॉ. गावतुरे यांच्या विजयाच्या शक्यता अधिक मजबूत झाल्या आहेत.

बैठकीत उपस्थित प्रतिनिधींनी काँग्रेसच्या उमेदवारी निर्णयाबाबत नाराजी व्यक्त केली व संतोष रावत हे सुधीर मुनगंटीवार यांचे डमी उमेदवार असल्याचा आरोप केला. डॉ. गावतुरे यांना समर्थकांच्या पाठिंब्याने विजय मिळवून आमदार सुधीर मुनगंटीवार यांचा पराभव करण्याची क्षमता असल्याचा विश्वास या बैठकीत उपस्थितांनी व्यक्त केला.

या वेळी उपस्थित प्रमुख मान्यवरांमध्ये ज्येष्ठ पत्रकार व दलित मित्र डी. के. आरिकर, सत्यशोधक समाजाचे हिराचंद बोरकुटे, भीम आर्मीचे सुरेंद्र रायपुरे, सोशल एज्युकेशनचे भास्कर मून, ड. प्रशांत सोनुले, प्रा. माधव गुरनुले, हेल्पिंग हँड्स फाऊंडेशनचे अजय दुर्गे आणि इतर अनेक सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर्स, वकील, तसेच प्राध्यापक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

डॉ. गावतुरे यांच्या या सामूहिक समर्थनामुळे बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील निवडणुकीचे चित्र बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे, आणि विविध सामाजिक संघटनांच्या पाठिंब्यामुळे त्यांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे.

# परभणी जिल्ह्यात विधानसभा निवडणूक

## अर्ज माघारी प्रक्रियेत ९२ उमेदवारांचे अर्ज मागे

**परभणी । लक्ष्मण उजगरे**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी परभणी जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघात अर्ज मागे घेण्याची आज अंतिम मुदत संपली. या प्रक्रियेत जिल्ह्यातील जिंतूर, परभणी, गंगाखेड आणि पाथरी या विधानसभा मतदारसंघांतील एकूण ९२ उमेदवारांनी अर्ज माघार घेतला. जिंतूर मतदारसंघातून एकूण २४ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. यामध्ये अपक्षांसह ऑल इंडिया हिंदुस्तान काँग्रेस पार्टी आणि राईट-टू-रिकॉल पार्टीच्या उमेदवारांचाही समावेश आहे. परभणी विधानसभा मतदारसंघात २२ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतला असून यामध्ये अपक्षांसह बहुजन भारत पार्टी आणि ऑल इंडिया मजलिस-ए-इन्कलाब-ए-मिल्लतच्या उमेदवारांनी देखील अर्ज मागे घेतले आहेत. गंगाखेड मतदारसंघातून १३ उमेदवारांनी माघार घेतली आहे, ज्यामध्ये न्यु राष्ट्रीय समाज पार्टीचा एक उमेदवार आणि अन्य अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. पाथरी मतदारसंघात सर्वाधिक ३३ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. यामध्ये बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी आणि ऑल इंडिया मजलिस-ए-इन्कलाब-ए-मिल्लतच्या उमेदवारांचाही समावेश आहे.या अर्ज माघारीनंतर सर्व मतदारसंघांतील अंतिम उमेदवारांची यादी लवकरच जाहीर होणार आहे.

# विधवा भगिनीच्या आसवांना मंगेश पोटवारांचा भावनिक आधार

## भाऊबीज साजरी करत दिला मदतीचा हात

**मूल । प्रतिनिधी**

टेकाडी येथील तरुण राहुल गेडाम यांचे अलीकडेच दु:खद निधन झाल्याने कुटुंबावर मोठे संकट कोसळले. अत्यंत हलाखीच्या आर्थिक परिस्थितीत राहणाऱ्या गेडाम यांच्या मागे पत्नी आणि मूकबधिर मुलगी असा परिवार आहे. गेडाम कुटुंबाच्या या दु:खात मंगेश पोटवार यांनी भावनिक आधार देत भाऊबीज साजरी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या उपक्रमातून गेडाम कुटुंबाला मानसिक आधार तर मिळालाच, शिवाय आर्थिक मदतीचा हात देत त्यांचे सांत्वन केले.



मंगेश पोटवार यांनी विधवा भगिनीच्या दु:खावर मायेची फुंकर घालत भाऊबीज साजरी केली आणि त्यांना आर्थिक मदतीचा हातभार लावला. यासह, मूकबधिर मुलीच्या आरोग्याबाबत विशेष लक्ष देण्याचा निश्चय करून तिच्या वैद्यकीय तपासणीसाठी आणि आवश्यक उपचारांसाठी मदत मिळवून देण्याचा निर्णय घेतला. मंगेश पोटवार समाजसेवेच्या विविध उपक्रमांतून गरजूंच्या मदतीला नेहमीच धावून जातात, आणि या उपक्रमाचे परिसरातील लोकांकडून विशेष कौतुक होत आहे.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे मूल शहराध्यक्ष आकाश येसनकर, वैद्यकीय मदत कक्षाचे तालुका अध्यक्ष आनंदराव गोहने, ज्येष्ठ कार्यकर्ते किसन गुरुनुले, ईश्वर भोयर, सुनील कामडी, मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष हरिदास गोहने, प्रकाश भोयर आदी मान्यवर उपस्थित होते.

# करमाळा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा साहित्यिक कार्यात दिनेश मडके यांची निवड

**सोलापूर । प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्याचे ज्येष्ठ पत्रकार दिनेश मडके यांची समरसता साहित्य परिषदेच्या जिल्हा सहकार्यवाहपदी निवड करण्यात आली आहे. प्रा. माधव कुलकर्णी यांनी त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केली. अखिल भारतीय स्तरावर कार्यरत असलेली समरसता साहित्य परिषद भारतीय संस्कृतीचे विविध पैलू आणि साहित्यिक समृद्धी जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य करते.



दिनेश मडके यांची निवड झाल्याने करमाळा तालुक्याच्या साहित्यिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे. मडके गेल्या १८-२० वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, साप्ताहिक पवनपुत्र या साप्ताहिकाचे संपादक आहेत. ते दैनिक जनसत्य आणि तरुण भारत संवाद बेळगाव येथे तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. समाजसेवेतही त्यांचा मोलाचा सहभाग असून ते कुणबी मराठा सेवा संघाचे १६ वर्षांपासून तालुकाध्यक्ष आहेत. तसेच, करमाळा तालुका डिजिटल मीडियाचे तालुकाध्यक्ष म्हणूनही त्यांनी यशस्वी कामगिरी बजावली आहे.

दिनेश मडके यांनी मराठा समाजातील विवाह जुळवण्याच्या गंभीर समस्येवर मराठा सोयरीक संघाच्या माध्यमातून प्रभावी प्रयत्न केले आहेत. सामाजिक कार्यात त्यांचा सतत सहभाग असल्याने त्यांचा जनसंपर्क दांडगा आहे, आणि समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांना उत्तम पाठिंबा लाभला आहे.

मडके यांच्या निवडीबद्दल डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटना महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष राजा माने, प्रदेश उपाध्यक्ष सतीश बापू सावंत, विजयराव पवार, मुकुंद साळुंके, शिवनाथ घोलप, नरेंद्रसिंह ठाकुर, हरिभाऊ हिरडे आणि दादासाहेब पिसे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# सावंत फॅमिलीचा फार्मूला,नारायण राव पाटील यांच्या कामी आला




**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यात सावंत गटाला एक महत्त्वाचा स्थान आहे, जो सध्या विधानसभा निवडणुकीत सक्रिय दिसत आहे. या गटाचे नेतृत्व सुनील बापू सावंत व ऍड राहुल सावंत करतात. त्यांनी आमदार संजय शिंदे यांच्यासाठी गेल्या काही वर्षांत महत्त्वाची भूमिका निभावली आहे. २०१४ साली स्व. सुभाष आण्णा सावंत यांनी शिंदे यांना दिलेल्या शब्दावर हा गट कायम प्रेम करत आहे.

परंतु, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सावंत फॅमिलीने एक नवा फार्मूला तयार केला आहे, ज्यामुळे महाविकास आघाडीच्या प्रेमाची चर्चा रंगली आहे. त्यांच्या या हालचालींमुळे तुतारीचे मार्केट चांगलेच गजबजले आहे. शहरातील नगरपालिका निवडणुकीत सावंत गटाकडे तीन ते पाच नगरसेवक असतात, त्यामुळे शहरात या गटाची उपस्थिति महत्त्वाची ठरू शकते.

सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत सावंत गटाने त्यांच्या भूमिकेबद्दल स्पष्टता दिली. त्यांनी मंगळवार, ५ नोव्हेंबर रोजी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश करण्याची घोषणा केली.

# वाढोणा येथे ढाल पूजा व गायगोधन पुजनाची ५०० वर्षांची परंपरा कायम

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वाढोणा येथील गावाच्या सीमेवर बलिप्रतिपदानिमित्य गायगोधन ढाल पूजा करण्यात आली. ऐतिहासिक व परंपरेचा वारसा लाभलेली ही पूजा विदर्भातील आदिवासी गोवारी जमाती तर्फे आजही श्रद्धेने साजरी केली जाते. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही पारंपरिक पद्धतीने ढाल पूजा साजरी करण्यात आली. गाई राखणे हा गोवारी जमातीचा पारंपरिक व्यवसाय असल्यामुळे, हे लोक गायीच्या भक्तिभावाने पूजा करून तिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. दीपावलीच्या तिसऱ्या दिवशी बलिप्रतिपदाच्या दिवशी गावातून ढाल मिरवणूक काढण्यात आली, आणि गोधना स्थळी पूजा करण्यात आली. यावेळी गायी, बैलांना सजविण्यात आले होते, आणि आदिवासी गोवारी जमातीतील स्त्री-पुरुषांनी पिवळा रंग वेष केला होता. जय सेवा गजरात ढाल मिरवणूक गोधन स्थळी पोहचली.



आदिवासी गोवारी जमात ५०० वर्षांची परंपरा जतन करून ढाल पूजा पारंपरिक पद्धतीने साजरी करत आहे. या प्रसंगी गावातील सर्व बैल, गायी, बकऱ्या व मेंढ्या गोधनावर कळपाने चालविण्यात आल्या. या विशेष कार्यक्रमात कुरमार समाजासह नागरिकांनी मोठा सहभाग घेतला.

यावेळी आदिवासी गोवारी समाजाचे अध्यक्ष सुभाष गजभे, प्रदीप येसनसुरे, तुळशीदास येसनसुरे, रामू वाघाडे, सोनल येसनसुरे, डॉ. विलास येसनसुरे, सरपंच देवेंद्र गेडाम, मुखरू राऊत, जसूजी वाघाडे, किशोर नेवारे, प्रकाश नेवारे, विठ्ठल गजभे, वासुदेव राऊत, माया राऊत, सिंधू येसनसुरे यांच्यासह गावातील नागरिकांची उपस्थिती होती.गावांच्या सीमेवर शेणापासून एक मोठी भुरसी बनवण्यात येते. या बुरशीमध्ये एक अंडे व कोंबडीचे लहान जिवंत पिल्लू ठेवण्यात येते. सभोवती एक फुटांच्या अकरा काड्यांचे कुंपण करण्यात येते. यावर गुलाबी रंगाची रिबीन गुंडाळून खणा नारळाने बुरशीची ओटी भरण्यात येते. आदिवासी गोवारी जमातीतील लोक ढालीचे पूजन करतात. या ढालीचा आकार २० ते २५ फूट लांब असून, लाकडी पाटावर तयार केली जाते.

> **आदिवासी गोवारी जमात ही ५०० वर्षांपासून ढाल पूजन करीत आहे. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या यादीत क्रमांक १८ वर असलेल्या आदिवासी गोंड - गोवारी जमातीला स्वत:ची संस्कृती व वारसा आहे.**
> **- सुभाष गजभे, अध्यक्ष आ.गो. गो. जमात संघटना, वाढोणा, ता. नागभीड**

या प्रथेनुसार गावांच्या शिवारांची पूजा करून आराध्यदैवत वाघोबाच्या मूर्तीची पूजा करण्यात येते. पूजा करून नारळ फोडून भूरसीची पूजा केली जाते. यानंतर अंडे व जिवंत पिल्लू असणाऱ्या भुरसीवरून बैल, गायी, म्हशी, शेळ्यांच्या कळपाने गायींना चालविण्यात येते. गेल्या ५०० वर्षापासून ही ढाल पूजन परंपरा आदिवासी बांधवांमध्ये कायम ठेवली जात आहे.

# निवडणूक प्रक्रिया मुक्त, निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे हौलनलाल गौईटे

**अकोले । प्रतिनिधी**

संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे सामान्य निवडणूक निरीक्षक (भा.प्र.से) हौलनलाल गौईटे यांनी निवडणूक प्रक्रिया निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी उमेदवारांना प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले. संगमनेर येथील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या सभागृहात अपक्ष उमेदवारांना चिन्ह वाटप, आदर्श आचारसंहिता आणि खर्चाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत गौईटे यांनी उमेदवारांना मार्गदर्शन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश हिंगे आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी धीरज मांजरे उपस्थित होते.

गौईटे म्हणाले की, विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने चांगली तयारी केली आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करत निवडणूक यशस्वीपणे पार पाडण्यासाठी उमेदवारांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी निवडणूक प्रचार करताना कोणाच्या धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घेण्याचे महत्त्व सांगितले. विधानसभेची उमेदवारी करणाऱ्या उमेदवारांना त्यांच्या दैनंदिन नोंदवही संपूर्ण प्रचार कालावधीत खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीस निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधी उपस्थित होते.





# शिवसेना शहर प्रमुख अभय चौधरी यांचा वाढदिवस साजरा





**मारेगांव । विशेष**

मारेगाव येथील उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना शहर प्रमुख अभय चौधरी यांचा वाढदिवस त्यांच्या निवासस्थानी आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात साजरा करण्यात आला. यावेळी वणी येथील सामाजिक कार्यकर्त्या किरणताई संजय देरकर यांनी शॉल व पुष्पगुच्छ देऊन अभय चौधरी यांचा सत्कार केला.यावेळी विठ्ठलराव चौधरी, पुष्पाताई चौधरी,वर्षा किंगरे, शुभांगी ठाकरे, स्मिता देवाळकर, पल्लवी बोढाले, करण किंगरे, अर्चना घुमे, रश्मी चौधरी, रूपाली चौधरी, डॉ यशवंत घुमे,अमर चौधरी, समीक्षा घुमे,अनुष चौधरी, आर्यन घुमे, आराध्य चौधरी,अद्विक चौधरी,अर्धी चौधरी यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

# खांडेश्वराच्या चरणी नारळ अर्पण करून प्रचाराची सुरुवात

**राहुरी । प्रतिनिधी**

१९७८ पासून खांडेश्वराच्या चरणी नारळ अर्पण करून प्रचाराची सुरुवात करण्याची परंपरा आहे. या पद्धतीमुळे परमेश्वरासह जनतेचा आशीर्वाद मिळत असून, सातत्याने मोठे यश प्राप्त झाले आहे. यावेळची निवडणूक अनेक कारणांमुळे गाजत आहे, ज्यात जनतेचा आशीर्वाद आणि पक्ष नेतृत्वाचा विश्वास महत्त्वाचा आहे. तथापि, सर्वोच्च पदावर असतानाही काही जण जाणीवपूर्वक त्रास देण्याचा प्रयत्न करत आहेत.मागील अडीच वर्षात तालुक्यातील वातावरण खराब करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे. चांगली घडी विस्कटित करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत, जसे की तालुक्यावर झालेली गरळ. धांदरफळ येथील घटनेची उल्लेखनीय टीका केली जात आहे, ज्यामुळे समस्त महिला भगिनींचा अपमान झाला. या घटनेनंतर



तालुक्यातील महिलांचा उद्रेक झाला, आणि त्यांनी त्याचा तीव्र अनुभव घेतला.संपूर्ण राजकारणात तत्वज्ञानावर बोलले जावे लागते, परंतु खालच्या पातळीचे राजकारण संगमनेर तालुका सहन करणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. देशमुख तर दोषी आहेच, परंतु त्याला समर्थन करणारे सर्व या घटनेला जबाबदार आहेत, असेही बोलण्यात आले. मागील अडीच वर्षात अनेक कार्यकर्त्यांवर खोट्या केसेस टाकण्यात आल्या आहेत, ज्यामुळे दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे.राज्यात महाविकास आघाडीला चांगले वातावरण असून, तालुक्यातील सर्व कार्यकर्ते एकवटले आहेत. ही निवडणूक चांगली सांभाळा, राज्यात सर्वाधिक मताधिक्य देऊन संगमनेर तालुका काँग्रेसच्या पाठीशी उभा आहे; हे संपूर्ण राज्याला दाखवा, असे आवाहन करण्यात आले. संगमनेर तालुका शांत आणि सुसंस्कृत आहे, आणि आम्ही कुणावर दादागिरी करत नाही, तर कुणाची दादागिरी सहन करत नाही, असे सांगितले.

# अपक्ष उमेदवारांचा आमदार संजय शिंदे यांना जाहीर पाठिंबा

**सोलापूर । प्रतिनिधी**

२४४ करमाळा विधानसभा मतदारसंघाच्या अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी, मराठा सेवा संघाचे माजी तालुका अध्यक्ष डॉ. सुजितकुमार काशिनाथ शिंदे यांनी संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या आदेशानुसार आपला उमेदवारी अर्ज माघारी घेऊन आमदार संजय विठ्ठलराव शिंदे यांना आपला जाहीर पाठिंबा दिला. यासोबतच, सुहास शिवमुर्ती ओहोळ यांनीही आपला अर्ज माघारी घेऊन आमदार संजय शिंदे यांना पाठिंबा दिला.

यावेळी बोलताना डॉ. सुजितकुमार शिंदे आणि सुहास ओहोळ म्हणाले की, आमदार संजयमामा शिंदे हे विकासप्रिय आमदार आहेत. त्यांच्या कामामुळे आम्ही प्रभावित झालो आहोत. तसेच, मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार हा निर्णय घेतला आहे. आमचा पाठिंबा देण्यापलीकडे आमदार शिंदे यांचा जाहीर प्रचार करून त्यांना निवडून आणण्यासाठी २४ तास प्रयत्न करणार आहोत.

यावेळी डॉ. सुजितकुमार शिंदे, सुहास ओहोळ यांच्यासह प्रवीण पाटील, सुजित बागल, तात्या पाटील, पै. अनिल पवार, गौतम ढाणे, सतीश पाटील, किसन पिंपरे, सोमा लांडे, बबन चोरमले, भाऊ साहेब शेळके, पैलवान अमोल गायकवाड, दिलीप बागल, नानासाहेब नलावडे, युवराज गपाट, मनोहर रंदवे, आबासाहेब ननवरे, अभिजीत ननावरे, अमोल चाळक, महेश काळे, विनय ननवरे, आजिनाथ मोरे, दिगंबर झिंजाडे आदी उपस्थित होते.

आमदार संजय शिंदे यांना मिळालेल्या या पाठिंब्यामुळे करमाळा विधानसभा मतदारसंघात राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. आगामी निवडणुकीत या पाठिंब्याचा मोठा प्रभाव पडणार असल्याचा विश्वास संबंधित उमेदवारांनी व्यक्त केला आहे.

# पाडवा संपला आणि नवऱ्याने रंग दाखवला; बायकोवर अ‍ॅसिड हल्ला

**पाथर्डी । प्रशांत कुंडकर**

राज्यभरात दिवाळीची धामधूम सुरू असताना, पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी पाथर्डी शहरातील अहिल्यानगर येथे एक भयानक घटना घडली. घरगुती वादातून एका नवऱ्याने आपल्या पत्नीवर अ‍ॅसिड हल्ला केला आहे, ज्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दुपारी बारा वाजेच्या सुमारास घडली. आरोपी पती निलेश उर्फ चंद्रकांत रमेश पांडव, जो पत्नी सोनाली दत्तात्रय भाळवणकरसोबत नाथनगरमध्ये राहतो, त्याने वादाच्या दरम्यान सोनालीला प्रश्न केला, तू मला सोडून इकडे का निघून आली? सोनालीने उत्तर दिले की, मला तुझ्या सोबत संसार करायचा नाही. तिच्या या बोलण्यामुळे चंद्रकांतचा राग वाढला आणि त्याने सोबत आणलेल्या अ‍ॅसिडच्या बाटलीतील तरल पदार्थ तिच्या अंगावर टाकला.या घटनेत सोनाली सुमारे २० टक्के भाजली गेली असून, तिच्या हात, मानेच्या बाजू आणि कमरेपासून खालच्या भागाला जखम झाली आहे. हे पती-पत्नी सहा महिन्यांपासून विभक्त राहत होते, याचाच राग चंद्रकांतने काढल्याचे समजते.आरडा ओरड झाल्यानंतर जवळच्या नागरिकांनी सोनालीला मदत केली, ज्यामुळे पुढील मोठा अनर्थ टाळला गेला. नागरिकांच्या मदतीने पोलिसांनी आरोपीला घटनास्थळावरून तात्काळ ताब्यात घेतले. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.




## सुरेल भजनाने दांडगांवकर मंत्रमुग्ध

# संत श्री नगाजी महाराज भजन मंडळ घुग्घुस यांचा उपक्रम

**वणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील दांडगांव (मुकटा) येथे संत श्री नगाजी महाराज महिला मंडळाचा भजन संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दांडगांव येथील शकुंतला चौधरी यांच्या निवासस्थानी आयोजित या भजन संध्या कार्यक्रमात भजन मंडळाच्या गायक कलावंतांनी अध्यात्मिक गाणी, भक्तीगीते, मराठी भावगीते, गौळणी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भजने,तथा मराठी व हिंदी भक्तिगीते गायली. या भजन संध्येत सर्व घुग्घुस निवासी भजन गायक कलावंतांनी सहभाग घेतला होता.ज्यात गजानन निंबाळकर, कवडु गौरकर, विजय गौरकर, गणेश वाटेकर, सदाशिव बरडे, लिलाबाई गौरकर, बेबीताई वाटेकर, पुष्पाताई नक्षणे, सरिता गौरकर, चैताली गौरकर, यांच्यासह बाल गायिका अक्षरा गौरकर,तृप्ती



भजन संध्या कार्यक्रमात उपस्थित चौधरी परीवाराचे आप्तगण

गौरकर,मनस्व गौरकर यांनी सुरेल आवाजात गिते गाऊन उपस्थितांची मने जिंकली. यावेळी अनेक आप्तगण व नातेवाईक उपस्थित होते. ज्यात प्रामुख्याने विठ्ठलराव चौधरी, संदीप चौधरी, डॉ. यशवंत घुमे, विनोद आंबेकर, संदीप बोकडे, समीक्षा घुमे, आर्यन घुमे, पार्वताबाई घुमे, शकुंतला चौधरी, सार्थक चौधरी, सुजल चौधरी, लिलाबाई मत्ते, सुनिता चौधरी, सृष्टी आंबेकर, पूर्वांश गौरकर यांचा समावेश होता.

# वाढोणा येथे ५०० वर्षांपासून चालत आलेली ढाल पूजा व गायगोधन पुजन परंपरा कायम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वाढोणा येथील गोधनाच्या ठिकाणी बलिप्रतिपदानिमित्त प्रत्येक वर्षी साजरी करण्यात येणारी ढाल पूजा आणि गायगोधन आजही तितक्याच श्रद्धेने आणि पारंपरिक पद्धतीने साजरी केली जात आहे. आदिवासी गोवारी जमातीच्या वाघाडे कुटुंबाच्या नेतृत्वाखालील या पवित्र अनुष्ठानामध्ये संपूर्ण गावाचा सहभाग असतो, ज्यामुळे या परंपरेचा महत्त्वपूर्ण वारसा जपला जात आहे.

गावाच्या सीमेवर गोधनाच्या ठिकाणी गाईंच्या श्रद्धेने पूजा करण्यात आली. आदिवासी गोवारी जमात हा गाईंचा पारंपरिक व्यवसाय चालवते, त्यामुळे या लोकांनी गायींच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या पूजा विशेष महत्त्वाच्या ठरतात. दीपावलीच्या तिसऱ्या दिवशी बलिप्रतिपदाला गोधना स्थळी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गायी आणि बैलांना सजवून ढाल सोहळा साजरा करण्यात आला. आदिवासी गोवारी जमातीतील स्त्री-पुरुषांनी पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान करून जय सेवा च्या गजरात ढाल मिरवणूक केली. ५०० वर्षांपासून चालत आलेल्या या परंपरेमध्ये गोधना भरवण्यात आले आणि गावातील सर्व बैल, गायी, बकर्या आणि मेंढ्यांचा कळप गोधनावर चालवण्यात आला. यामध्ये स्थानिक नागरिकांचा मोठा सहभाग होता. ढाल पूजनाच्या प्रक्रियेत शेणाने तयार केलेली एक मोठी भुरसी वापरली जाते, ज्यात एक अंडे आणि कोंबडीचे पिल्लू ठेवले जाते. सभोवती ११ काड्यांचे कुंपण करून त्यावर गुलाबी रिबीन गुंडाळले जाते. या पारंपरिक पूजेत २० ते २५ फूट लांबीच्या काठीवर लाकडी पाट्या बसवून ढाल तयार केली जाते. ४ मुखी ढाल स्त्री रुपाचे प्रतीक असून, २ मुखी ढाल पुरुष रुपाचे प्रतीक आहे. या पूजेच्या निमित्ताने आदिवासी गोवारी समाजाचे अध्यक्ष सुभाष गजभे, प्रदीप येसनसुरे, तुळशीदास येसनसुरे, रामू वाघाडे, आणि गावातील इतर मान्यवर उपस्थित होते. या अनुष्ठानामुळे आदिवासी गोवारी जमात आपल्या परंपरेची जपणूक करत असून, या पूजा त्यांनी ५०० वर्षांपासून चालवली आहे. आदिवासी गोवारी जमात ५०० वर्षांपासून ढाल पूजन करीत आहेत. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या यादीत क्रमांक १८ वर असलेल्या आदिवासी गोंड - गोवारी जमातीला स्वतःची संस्कृती व वारसा आहे, असे सुभाष गजभे यांनी सांगितले. या परंपरेने आदिवासी संस्कृतीची श्रीमंती आणि वारसा जपण्याची प्रेरणा दिली आहे, जी भविष्यातही टिकून राहील.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# आदिस्ते मुळगाव जाधव भावकीचा उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात पक्ष प्रवेश

**महाड । प्रतिनिधी**

खाडीपट्ट्यातील प्रदूषणामुळे शेतकरी वर्गाची शेती नापीक झाली असून, कडधान्याला योग्य प्रकारचा हमीभाव मिळत नाही. यामुळे सर्व नागरिकांना, विशेषतः शेतकरी वर्ग आणि महिला वर्गाला न्याय देण्याचे काम करण्याची ग्वाही आदिस्ते मुळगाव जाधव भावकीच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करताना दिली.

मुळगाव जाधवमध्ये शेकडो नागरिकांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात पक्षप्रवेश करून खाडीपट्टा आमचा बालेकिल्ला असल्याचे दाखवून दिले. उपस्थितांनी जोरदार घोषणा बाजी करत २३ नोव्हेंबरला गुलाल आपणच उडवणार असा विश्वास व्यक्त केला.

पक्षप्रवेश कर्त्यांना योग्य ती सन्मानाची वागणूक दिली जाईल. आजही या विभागातील हजारो नागरिक मतदार पाठीशी ठामपणे उभे आहेत, असे सांगताना त्यांनी खाडीपट्ट्यातील मतदारांची भूमिका महत्त्वाची आणि लीड देणारी असणार असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी सांगितले की, या भागातील अनेक बचत गट कार्यरत असून, त्या बचत गटातील महिलांना व त्यांच्या उत्पादनाला कशाप्रकारे प्रसिद्धी देता येईल यासाठी महिला सबलीकरण आणि सक्षमीकरणावर भर देण्यात येईल.

या कार्यक्रमाला माजी जिप सदस्य इब्राहिम झमाने, विधानसभा संपर्क प्रमुख अमित मोरे, तालुका प्रमुख आशिष फळसकर, तालुका संघटक राजुशेठ कोरपे, तालुका युवासेना अधिकारी प्रफुल धोंडगे, संदेश गोठलं, सुनील जाधव, अमीन झमाने, जुहेब देशमुख, विक्रम मालप, महेश दवंडे, जाफर झटाम, समीर देवळे, योगेश सुतार यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

पक्ष प्रवेश करणाऱ्यात संजय जाधव, संदीप जाधव, मंगेश जाधव, अरविंद जाधव, कल्याणी जाधव, अभिजीत जाधव, प्रियंका जाधव, अशोक जाधव, महेंद्र जाधव, प्रकाश जाधव, रामदास जाधव, प्रदेश जाधव, शाखाप्रमुख लहुजी महाडिक, शैलेश जाधव, विघ्नेश जाधव, कल्पेश जाधव, संतोष जाधव, सुनील जाधव, निलेश जाधव, महेंद्र जाधव, अरविंद जाधव, संजय जाधव, मंगेश जाधव, अनंत जाधव, अभिजित जाधव, मितेंद्र जाबडे, शंकर जाधव, ओंकार जाधव, सुदर्शन जाधव, अक्षय जाधव, संतोष जाधव, सुनील जाधव आणि सर्व मान्यवर उपस्थित होते.



## अखिल भारतीय खुली आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा ६ नोव्हेंबरपासून अहिल्यानगर येथे सुरू

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशन व अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय खुली आंतरराष्ट्रीय मानांकित बुद्धिबळ स्पर्धा बुधवारी, ६ नोव्हेंबरपासून अहिल्यानगरमधील सप्तक सदन येथे सुरू होणार आहे. ही स्पर्धा रविवारी, १० नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे, अशी माहिती अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.



देशभरातून विविध राज्यांतील खेळाडू या स्पर्धेत सहभाग घेणार असून गुजरात, आंध्र प्रदेश, दिव, दमन, गोवा, तमिळनाडू आदी राज्यांमधून २०० हून अधिक खेळाडूंनी आपली नोंदणी केली आहे. इंटरनॅशनल मास्टर विक्रमादित्य कुलकर्णी यांच्यासह अनेक दिग्गज खेळाडूही स्पर्धेत सहभागी होणार असल्याचे जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

या स्पर्धेत ५.५ वर्षांचा सर्वात लहान खेळाडू आणि ८३ वर्षांचे ज्येष्ठ खेळाडू यांचा समावेश असून, बुधवारी सकाळी ११.३० वाजता स्पर्धेचे उद्घाटन होईल. एकूण ९ फेऱ्यांत खेळवण्यात येणाऱ्या या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ रविवारी, दुपारी २ वाजता अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते होणार आहे.

स्पर्धेच्या पंच म्हणून शार्दुल तापसे (सांगली), अमरीश जोशी (संभाजीनगर), पवन राठी (पुणे) यांच्यासह चार सहाय्यक पंचांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी दिली.

## वक्फ बोर्ड बरखास्त करा, हिंदूंच्या देवस्थानांच्या मालमत्ता मुक्त करा–मरकड

**पाथर्डी । प्रतिनिधी**


महाराष्ट्रातील कानिफनाथ देवस्थानच्या जमिनीवर वक्फ बोर्डाने हक्क सांगितल्याने नाथ भक्तांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. याबाबत मढी येथील कानिफनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय मरकड यांनी वक्फ बोर्ड बरखास्त करण्याची मागणी केली आहे.

संजय मरकड यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, वक्फ बोर्डाने कानिफनाथ देवस्थानाच्या भूमीवर अन्यायकारक दावा केला आहे. ही देवस्थाने नाथ संप्रदायाची असून ती अतिक्रमणमुक्त करावीत, अशी भूमिका त्यांनी मांडली. यावेळी अमोल वाघ व कायदेशीर सल्लागार डॉ. प्रसाद कोळसे उपस्थित होते.संजय मरकड यांनी सांगितले की, वक्फ बोर्डाने २०११, २०१२, आणि २०१७ साली कानिफनाथ देवस्थानला नोटीस दिल्या आहेत. त्यावरून वक्फ बोर्डाने जवळपास १ हजार एकर जमिनीवर दावा केला आहे, जो नाथ संप्रदायाच्या भावनांना धक्का देणारा आहे.



### दुर्गापूर येथे अध्यात्मिक संजीवन सभा

## समाजाची नि:स्वार्थ सेवा हे ईश्वरीय कार्य–ना.मुनगंटीवार





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गरीब आणि उपेक्षितांची सेवा करण्यासारखा मोठा धर्म कोणताच नाही. सर्व जाती–धर्म मानवता या एकाच धर्माने बांधले गेले आहेत. येथील गरीब व कष्टकऱ्यांच्या कल्याणासाठी जीव तोडून कार्य केले. नि:स्वार्थ सेवा हे ईश्वरीय कार्य आहे असे मी मानतो. त्यामुळे मानवसेवेसाठी प्रत्येकजण पुढे आला तर समाजाची प्रगती साधता येईल, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

दुर्गापूर येथे अध्यात्मिक संजीवन सभेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ना. मुनगंटीवार बोलत होते. ते म्हणाले,

### बेरोजगारांसाठी रोजगाराची व्यवस्था

**चंद्रपुरातील सुपर थर्मल पावर स्टेशन येथे ऊर्जा निर्मितीचा ८ व ९ क्रमांकाचा संच उभारण्याचे काम झाले आहे. ८०० मेगावॅट विद्युत निर्मिती संच उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पोंभुर्णा तालुक्यात सर्वात मोठी इंडस्ट्री उभी राहत असून येथे मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होईल. जिल्ह्यात येणाऱ्या उद्योगांमध्ये स्थानिकांना नोकरीसाठी प्रथम प्राधान्य देण्याचा निर्णय करण्यात येणार असल्याचेही ना. मुनगंटीवार म्हणाले.**

'गरिबांची सेवा करणे पुण्याचे कार्य आहे. मी शेवटच्या घटकातील गरिबांची सेवा करण्याचा संकल्प केला आहे. गरीब, कष्टकऱ्यांसह सर्व जाती–धर्मातील नागरिकांची सेवा करण्याकरिता मी कटीबद्ध आहे. त्यांच्या सर्वांगींण विकासासाठी सर्व शक्तिनिशी उभा राहील.'मी गरीब व कष्टकऱ्यांच्या कल्याणासाठी जीव तोडून कार्य केले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून दिल्यात. गरिबांचे ऑपरेशन केले. जीवनामध्ये जात, पात, धर्म न पाहता गरीबांच्या कल्याणासाठी कार्य केले, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

ना.मुनगंटीवार म्हणाले, 'दुर्गापुर क्षेत्रात विविध विकासकामे करण्यात आली. अपूर्ण कामे लवकरच पूर्णत्वास येतील. जाती–पातीच्या नव्हे तर समतोल विकास व कार्याच्या आधारावर समोर जायचे आहे. यापूर्वी येथील सेंट मायकल चर्चला ५८ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या क्षेत्रातील दुर्गापुर, नेरी, पायली, भटाळी, ऊर्जानगर येथील बेघरांना येत्या पाच वर्षात स्वतःच्या हक्काचे घरकुल उपलब्ध करून देण्यात येईल.

## पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली




**मुंबई । प्रतिनिधी**

ऐन विधानसभा निवडणुकीच्या धामधडीत निवडणूक आयोगाने मोठा 'ॲक्शन' घेत रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवले आहे. त्यांच्याजागी वरिष्ठ 'आयपीएस' अधिकाऱ्यांकडे पदभार द्यावा, असे निर्देश निवडणूक आयोगाने राज्याच्या मुख्य सचिवांना दिले आहेत.

काँग्रेससह महाविकास आघाडीतील नेत्यांनी रश्मी शुक्लांना हटविण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली होती. त्यामुळे महाविकास आघाडीच्या मागणीला यश आलं आहे. विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून राज्यातील राजकीय हिंसाचारात वाढ झाली आहे, विरोधी पक्षाचे उमेदवार आणि नेतेमंडळींना धमकावले जात आहे. कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडली असल्याने काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे. या पार्श्वभूमीवर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवून रश्मी शुक्ला यांना तातडीनं पदावरून दूर करावे, अशी मागणी केली होती. निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घेतल्याचे दिसत आहे, कारण रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली आहे. त्यांनी कुठे बदली केली आहे आणि कुठला पदभार देण्यात आला आहे, याची माहिती अद्याप मिळालेली नाही.

रश्मी शुक्ला १९८८ च्या बॅचच्या 'आयपीएस' अधिकारी आहेत. सशस्त्र सीमा बलचे केंद्र प्रमुख आणि पुणे पोलीस आयुक्त म्हणून त्यांनी कार्य केले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील अधिकारी म्हणून देखील रश्मी शुक्ला यांची ओळख आहे. महाविकास आघाडीतील नेत्यांचे फोन टॅपिंग केल्याच्या प्रकरणामुळे त्या चर्चेत आल्या होत्या.रश्मी शुक्ला यांचा कार्यकाळ संपला आहे. मात्र, दोन वर्षे त्यांना मुदतवाढ देण्यात आली आहे. कार्यकाळ संपल्यानंतर शुक्लांना घरी पाठवलं पाहिजे. निवडणुकीच्या कोणत्याही प्रक्रियेत शुक्लांना ठेवण्यात येऊ नये, अशी आमची विनंती राहणार आहे. पोलीस महासंचालक हे महत्त्वाचं पद आहे. रश्मी शुक्ला पदावर बसल्यापासून कायदा सुवस्था बिघडलेली होती. वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पोलीस महासंचालक पदाची जबाबदारी देऊन राज्यातील गुन्हेगारी संपवावी, अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे.

# प्रत्येक व्यक्तीला रोजगार दिल्याशिवाय स्वस्त बसणार नाही: सिद्धार्थ खरात

## उत्कर्षच्या पहिल्याच रोजगार मेळाव्यात ६०० जणांना नोकरी

**मेहकर । प्रतिनिधी**

लोणार तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांना प्रत्यक्ष रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी उत्कर्ष फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष सिद्धार्थ रामभाऊ खरात यांच्या बतीने कृषी वैभव लॉन मेहकर येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात ५७ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. उत्कर्ष फाऊंडेशनने आयोजित केलेल्या या मेळाव्यात ११०० इच्छुकांनी हजेरी लावली, तर ६०० उमेदवारांना मुलाखती द्वारे थेट जाग्यावरच रोजगार मिळाला. उद्घाटन समारंभात जिल्हा संपर्क प्रमुख उपस्थित होते. उत्कर्ष फाऊंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ खरात म्हणाले, प्रत्येक व्यक्तीला रोजगार दिल्याशिवाय स्वस्त बसणार नाही. या रोजगार मेळाव्यात भाग घेतलेल्या श्रद्धा दिलिप गवईने प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, मला कॉस्मो फिल्म कंपनीत कायमस्वरूपी नोकरी मिळाली, ही माझ्यासाठी खूप आनंदाची बाब आहे. या नोकरीने माझ्या आयुष्याला सुरुवात होईल, तसेच माझ्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळण्यासाठी देखील ही नोकरी महत्त्वाची ठरेल.

यावेळी प्रा. नरेंद्र खेडेकर अध्यक्ष होते, तर प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, निंचा पांडव, दिपक मापारी, किशोर गारोळे, ड. आकाशभाऊ पोडे, अंकुर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गोविंद गोंड पाटील, ड. संदीप गवई, संजीवनी बाघ, नगमा गवळी, शैलेश बावस्कर, प्रदीप बिलोरे, सोपान देबाजे, कुणाल राबल, राजेश्वर गायकवाड आणि भाऊराव बोरकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.कौशल्य विकास क्षेत्रात काम करणाऱ्या कृषी, बँकिंग, फायनान्स, ऑटोमोबाईल, इंजीनियरिंग, मेडिकल, कॉटन, बजाज, टाटा, डिलिव्हरी आणि सर्व्हिसेस, फर्टीलायझर अशा जवळपास ५७ खाजगी कंपन्यांनी या मेळाव्यात सहभाग नोंदवला. या रोजगार मेळाव्यात उमेदवारांना दरमहा २० हजार रुपये पासून ५० हजार रुपये पगाराच्या नोकऱ्या उपलब्ध करण्यात आल्या. सुमारे १५०० उमेदवारांनी रजिस्ट्रेशन केले होते, त्यापैकी ११०० इच्छुकांनी प्रत्यक्ष निवड प्रक्रियेत सहभाग घेतला. सिद्धार्थ खरात यांनी विश्वास व्यक्त केला की, नोंदणी केलेल्या इतर उमेदवारांना लवकरच अपेक्षित नोकरी मिळेल.

# आम्ही तिन्ही पक्ष लढू, जिंकू आणि महाराष्ट्रावर महायुतीचा झेंडा फडकवू-भाजपा गटनेते आ.प्रविण दरेकरांना विश्वास

**मुंबई । (वृत्तसंस्था)**
काल मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि तिन्ही पक्षाचे प्रमुख नेते यांची बैठक झाली. दोन-तीन अपवाद वगळले तर सर्व ठिकाणची बंडखोरी क्षमतेय. ४ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा आहे. आम्ही तिन्ही पक्ष लढू, जिंकू आणि महाराष्ट्रावर महायुतीचा झेंडा फडकवू, असा विश्वास भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकरांनी व्यक्त केला. आज दिवाळीच्या पहिल्या दिवशी भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडिंवर भाष्य केले.

काँग्रेसचे रवी राजा यांच्या भाजपा प्रवेशावर दरेकर म्हणाले की, रवी राजा हे केवळ काँग्रेसचे कार्यकर्ते किंवा नेते नाहीत. तर एक अभ्यासू अशा प्रकारचे विरोधी पक्षनेता म्हणून मुंबईकरांच्या प्रश्नावर मुंबई महापालिकेत त्यांची कारकीर्द गाजली आहे. लोकाभिमुख अशा प्रकारचे व्यक्तिमत्व आहे. कोणीतरी आले एवढ्या पुरता हा विषय सिमीत नसून एक विरोधी पक्षनेता आज काँग्रेसमधून भाजपात येतो हे प्रतिबिंब कशाचे आहे हे काँग्रेसने समजून घेण्याची गरज आहे. विरोधी पक्षनेत्यालाच आपल्या पक्षावर विश्वास नाही, भाजपावर विश्वास निर्माण होतो यावरून काँग्रेसमध्ये अनेक अशी लोकं आहेत जी भाजपाचे, महायुतीचे काम करणार आहेत आणि सरकार आणणार आहेत. आता विजय वडेट्टीवार येऊ नये. त्यांचीही काँग्रेसमध्ये घुसमट होतेय. मनोज जरांगे पाटील यांच्या विधानावर बोलताना दरेकर म्हणाले की, जरांगेंनी सगळ्याच जागा लढवल्या पाहिजेत. त्यांचा हेतू पाडापाडीचा असेल तर त्याला मराठा समाज, मतदार दाद देणार नाही. लोकांना सकारात्मक राजकारण पाहिजेय. मराठा समाजाचे उमेदवार पाडायचे दुसऱ्या बाजूने ओबीसीतून आरक्षण द्या बोलायचे, इम्तियाज जलील यांना मिठ्या मारायच्या, हे मराठा समाजाला आवडत नाही. त्यांनी लढावे, जिंकावे यासाठी आमच्या शुभेच्छा असल्याचेही दरेकर म्हणाले.

तसेच जरांगे केवळ आता मराठा समाजाचा चेहरा होऊ पाहत नाही. मराठा समाजाने त्यांना नाव, लौकिक, चेहरा दिला. परंतु त्यांच्यात राजकारणाचे वारं भिनलेय, असे टिकास्त्र भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी सोडले आहे. तसेच जरांगे पाटील यांच्या भुमिका मराठा समाजासाठी ज्या पहिल्या होत्या त्या आता राहिलेल्या नाहीत. मराठा समाज ताकदीने महायुतीच्या मागे उभा राहील. निकालातून ते दिसून येईल, असा ठाम विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला. सर्व पक्षांना, सर्व जातीधर्मांना बरोबर घेऊन एक निधर्मवादी असा नेता म्हणून त्यांची छबी पुढे आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. जरांगेंनी आता समाजाच्या गोष्टी करू नयेत, राजकारण करावे आणि राजकीय पक्ष असतात तसे काम करावे, असा टोलाही लगावला.



### गोपाळ शेट्टीनी पक्षासोबत राहावे

**दरेकर म्हणाले की, गोपाळ शेट्टी हे पक्षाला मानणारे, पक्षाची विचारधारा मानणारे अशा प्रकारचे नेते आहेत. लोकांमध्ये काम करणारे आहेत. आम्हाला पूर्ण विश्वास आहे ते पक्षासोबत राहतील. ४ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घ्यायचा आहे. पक्षाने त्यांना खूप दिले आहे. नगरसेवक, आमदार, खासदार झाले. अशा वेळी त्यांनी पक्षासोबत राहावे, अशी अपेक्षा असल्याचेही दरेकरांनी म्हटले. नवाब मलिक यांच्यावर बोलताना दरेकर म्हणाले की, यासंदर्भात भाजपने स्पष्ट भुमिका अनेकदा सांगितली आहे. फडणवीस, शेलार यांनी मांडलेली भुमिका तीच आमचीही भुमिका आहे. नवाब मलिक यांनी काय करावे हा त्यांचा विषय आहे.**

### ...तर आम्हीही सहन करणार नाही

**दरेकर म्हणाले की, देवेंद्र फडणवीस एक संयमी नेते आहेत. राज्याचे लोकप्रिय, समंज्यस अशा प्रकारचे नेतृत्व आहे. जरांगेंना सांगितलेय व्यक्तिशः टार्गेट कुणाला, पक्षाला करू नका. तुम्ही समाजाची चळवळ चालवा आम्ही सोबत आहोत. परंतु व्यक्तिगत पक्षावर आणि फडणवीसांवर याल तर आम्हीही सहन करणार नाही, असा इशाराही दरेकरांनी जरांगे यांना दिला.**

# उरुळी कांचन, शिंदवणे व टिळेकरवाडी येथील अवैध हातभट्टींवर पोलिसांचे छापे

## ४५०० लिटर दारू,कच्चे रसायनासह ३ लाखाचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**
उरुळी कांचन, शिंदवणे आणि टिळेकरवाडी येथील अवैध हातभट्टींवर उरुळी कांचन पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेने बुधवारी (ता. ३०) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास छापे टाकले.
या कारवाईत पोलिसांनी ४५०० लिटर कच्चे रसायन व दारू असा ३ लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
पोलिसांनी तीन वेगवेगळ्या ठिकाणी एकाच दिवशी छापे टाकले, ज्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. गुन्हा दाखल झालेल्या आरोपींमध्ये शायना क्रिश राठोड (वय-१९, रा. काळेशिवार, शिंदवणे), राजेश लोंढे (रा. पांढरस्थळ, उरुळी कांचन) आणि परलोक रजपूत (रा. गोळीबार मैदान, उरुळी कांचन) यांचा समावेश आहे. पहिल्या घटनेत, शिंदवणे



ग्रामपंचायत हद्दीतील काळेशिवार परिसरात एक महिला गावठी हातभट्टी दारू तयार करीत होती. पोलिसांनी छापात ३५० लिटर रसायन व ३५ लिटर दारू व सरपण असा १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.
दुसऱ्या घटनेत, उरुळी कांचन ते डाळींब रोडवरील पांढरस्थळ परिसरात राजेश लोंढे हा गावठी दारू बनवीत असताना आढळला. मात्र त्याला पोलीस आल्याची चाहुल लागताच तो झाडाझुडपातुन पळाला. या कारवाईत १६०० लिटर कच्चे रसायन व ३८५ लिटर गावठी हातभट्टी दारू असा ८४ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.तिसऱ्या घटनेत, टिळेकरवाडीतील भवरापूर व टिळेकरवाडीच्या वेशीच्या ओढयालगत अवैध दारू तयार केली जात होती. या छाप्यात पोलिसांनी २००० लिटर कच्चे रसायन व १७५ लिटर गावठी हातभट्टी दारू असा एकूण ८९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.
याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात एका महिलेसह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पोलिसांचे नागरिकांकडून भरभरून कौतुक होत आहे. या कारवाईने अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.
अवैध दारू विक्री करणाऱ्या दोघांवरही कारवाई करण्यात आली. नायगाव येथे विदेशी दारू विक्री करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली आणि २७८० रुपयांची विदेशी दारू जप्त केली. अशा प्रकारच्या कार्यवाहीमुळे नागरिकांमध्ये सुरक्षा भावना वाढली आहे आणि पोलिसांच्या कार्याची प्रशंसा होत आहे.

# उल्हानगरमध्ये मोठं घबाड; संशयित कारवर भरारी पथकाचा छापा

**ठाणे । प्रतिनिधी**
दिवाळीच्या धूमधडाक्यात विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय गडबड सुरू आहे. निवडणूक आयोगाने राज्यात भरारी पथके तैनात केली असून, पोलीस यंत्रणा देखील सज्ज आहे.
अलीकडेच पुणे जिल्ह्यातील खेड शिवापूर येथे पोलिसांनी एक कार जप्त केली होती, ज्यामध्ये तब्बल ५ कोटी रुपयांची रोकड आढळून आली होती. यानंतर, पुण्यात सोन्याच्या दागिन्यांची वाहतूक करणारा टेम्पोही पोलिसांनी ताब्यात घेतला. बुधवारी पालघरमध्ये ५ कोटींची रोकड जप्त झाल्यानंतर आता उल्हासनगरमध्येही एका कारमध्ये मोठी रोकड पोलिसांनी जप्त केली आहे. उल्हासनगर विधानसभा १४१ मतदारसंघात मुरबाडच्या दिशेने जाणाऱ्या एका कारमधून १७ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. निवडणूक भरारी पथकांनी रात्री दोनच्या सुमारास कल्याणकडून मुरबाडकडे जाणारी कार संशयास्पद आढळून आल्याने तिची तपासणी केली. तपासणीदरम्यान रोख रक्कम आढळून आल्याने भरारी पथकाने ती जप्त केली. या रकमेचे नोंदणी कार्यवाहीसाठी पोलिसांनी कोषागार विभागात जमा केले आहे. तसेच, आयकर विभागाला तत्काळ माहिती देण्यात आली आहे. २०२४ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज आणि मौल्यवान धातूंसह १५ ते ३० ऑक्टोबर २०२४ दरम्यान एकूण १८७ कोटी ८८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली. निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत सजगपणे कार्यरत असलेल्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी या यशात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. पोलीस विभागाने सुमारे ७५ कोटी रुपये, आयकर विभागाने सुमारे ६० कोटी रुपये आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने सुमारे ११ कोटी रुपयांच्या बेकायदा मालमत्तेवर कारवाई केली आहे. मतदारांना आचारसंहिता भंगाचा प्रकार आढळल्यास आयोगाच्या 'सी-व्हिजील' पवर तक्रार करण्यास प्रोत्साहित करण्यात आले आहे. या तक्रारींची माहिती सर्व अंमलबजावणी यंत्रणांना दिली जात असल्याने आवश्यक ठिकाणी जप्तीची कारवाई केली जात आहे.

# कर्जत-खालापूर मतदार संघातील चौरंगी लढतीत शिवसेनेचे नितीन सावंत घेणार आघाडी

**कर्जत । प्रशांत कुंडकर**
कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघातील महायुतीच्या बंडखोरीमुळे मिंधे गटाचे उमेदवार महेंद्र थोरवे यांच्या अडचणी वाढल्या आहेत. या बंडखोरीमुळे मतदारांमध्ये नाराजी असून, थोरवे यांच्या विरोधात संतापाची लाट आहे. त्यामुळे या निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत बाजी मारतील, असे चित्र दिसत आहे.




या मतदारसंघात शिवसेनेचे नितीन सावंत, मिंधे गटाचे महेंद्र थोरवे, राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे बंडखोर सुधाकर घारे, आणि भाजपचे बंडखोर किरण ठाकरे यांच्यात चौरंगी लढत होणार आहे. थोरवे यांच्या कार्यकाळातील असंतोषामुळे त्यांच्या सहकारी पक्षांनी थेट विरोधात उमेदवार उभे केले आहेत, ज्यामुळे महायुतीच्या मतांची विभागणी होणार असून, थोरवे यांचे मताधिक्य घटणार आहे.
महाविकास आघाडी नितीन सावंत यांच्या मागे ठामपणे उभी असल्याने सावंत यांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. त्यांच्या प्रचार दौऱ्याला मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे थोरवे यांची झोप उडाली आहे.नितीन सावंत यांचा मतदारसंघात दांडगा जनसंपर्क आहे. त्यांनी कर्जत-खालापूरवासीयांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक केली आहे. पाणीप्रश्नावर घेतलेल्या ठोस भूमिका, वाडय़ा-पाडय़ांवरील जनतेशी जवळीक, बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारक उभारण्याचा निर्धार यामुळे मतदारसंघावर त्यांनी आपला ठसा उमटवला आहे.

# काँग्रेसचे ॲड.हरीश रावळ यांनी घेतला अर्ज मागे, राजेश एकडे यांना पाठिंबा



**मलकापूर (प्रतिनिधी) –** मलकापूर मतदारसंघात काँग्रेसचे आमदार राजेश एकडे यांच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल करणारे काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष डव्होकेट हरीश रावळ यांनी आज आपला अर्ज मागे घेतला. पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपानंतर रावळ यांनी राजेश एकडे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

# बुलडाण्यातून विजयराज शिंदे यांची माघार; समर्थकांमध्ये संभ्रम



**बुलडाणा । प्रतिनिधी**
बुलडाणा विधानसभा मतदारसंघातील भाजपचे माजी आमदार विजयराज शिंदे यांनी ०४ नोव्हेंबर ला आपला अर्ज मागे घेत निवडणुकीतून माघार घेतली आहे. विद्यमान आमदार धर्मवीर संजय गायकवाड आणि विजयराज शिंदे यांच्यातील राजकीय मतभेद सर्वज्ञात आहेत. शिंदे यांनी महायुतीत बंडखोरी करून मैत्रीपूर्ण लढतीची परवानगी पक्षाकडे मागितली होती; परंतु आज त्यांनी अचानक उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.या निर्णयानंतर विजयराज शिंदे यांना बुलडाणा मतदारसंघात पक्षाचे काम न करता मोर्शी, अचलपूर आणि तिवसा मतदारसंघात काम करण्यासाठी पाठवले जाणार आहे, अशी माहिती समोर आली आहे. शिंदे यांच्या माघारीचे कारण स्पष्ट न झाल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये खळबळ उडाली असून विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

## बाळासाहेब असते तर त्यांनी थोबाडं फोडलं असतं

# लाडक्या बहिणींबद्दल अपशब्द बोलणाऱ्यांना जनताही माफ करणार नाही-एकनाथ शिंदे

**मुंबई (वृत्तसंस्था)**
शिवसेना ठाकरे गटाचे नेते अरविंद सावंत यांनी शिवसेना शिंदे गटाच्या मुंबादेवी मतदारसंघाच्या उमेदवार शायना एन.सी. यांच्याविरोधात वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात येत आहे. दरम्यान यावरून आता राजकारण चांगलंच तापलं आहे. याविरोधात नागपाडा पोलिस ठाण्यात तक्रारदेखील दाखल करण्यात आली आहे. या वक्तव्यावर एकनाथ शिंदे यांनीही नाराजी व्यक्त केली आहे.एकनाथ शिंदे म्हणाले की, बाळासाहेब असते तर त्यांनी अशा नेत्यांचं थोबाडं फोडलं असतं. लाडक्या बहिणींबद्दल अपमानास्पद विधान करणाऱ्यांना जनता कधीच माफ करणार नसल्याचेही शिंदे म्हणाले. शायना एनसी यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याच्या त्यांनी यावेळी निषेध केला.दुसरीकडे, शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे यांच्याकडून या वक्तव्याप्रकरणात अरविंद सावंत यांच्याविरोधात निवडणूक आयोगाला एक पत्र देखील पाठवण्यात आलं आहे. महिलांविरोधात वक्तव्य करणाऱ्यांच्या विरोधात तातडीनं कारवाई करावी, अशी मागणी निलम गोऱ्हे यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.अरविंद सावंत यांनी शायना एन.सी. यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात येत आहे. 'त्यांची अवस्था बघा. त्या आयुष्यभर भाजपात राहिल्या आणि दुसऱ्या पक्षात चालल्या गेल्या. इंपोर्टेड माल इथे काम करत नाही. इथे फक्त ओरिजनल माल काम करतो', असं वक्तव्य अरविंद सावंत यांनी केलं आहे. यावरून आता राजकारण चांगलंच तापलं आहे. यावर स्पष्टीकरण देताना आपल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावला असं सावंत यांनी म्हटलं आहे.